CXS Per GP



शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आ.३, दि.१९ मार्च, २००५ चे सहपत्र

परिशिष्ट 'अ'

शासन विनिर्दिष्ट २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांची यादी.

१) हृदयविकाराचा झटका (Cardiac emergency) मेंदूचा झटका (cerebral vascular) फुफ्फुसांच्या विकाराचा झटका (Pulmonary emergency)/ ॲन्जिओग्राफी चाचणी
२) अति रक्तदाब (Hypertension)
३) धनुर्वात (Titanus)
४) घटसर्प (Diphtheria)
५) अपघात (Accident) आघात संलक्षण (Shock Syndrome) हृदयाशी आणि रक्तवाहिन्यांशी संबंधीत (Cardiological and Vascular)
६) गर्भपात (Abortions)
७) तीव्र उदर वेदना/आंत्र अवरोध (Acute abdominal pains/Intestinal obstruction)
८) जोरदार रक्तस्त्राव (Severe haemorrhage)
९) गॅस्ट्रो--एन्ट्रायटिस (Gastro--Entrietis)
१०) विषमज्वर (Typhoid)
११) निश्चेतनावस्था (Coma)
१२) मनोविकृतीची सुरुवात (Onset of psychiatric disorder)
१३) डोळ्यातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the eye)
१४) स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्त्र संबंधित यांच्याशी आकस्मिक आजार (Gynaecological and obstetric emergency)
१५) जननमूत्र आकस्मिक आजार (Genito - urinary emergency)
१६) वायू कोथ (Gas Gangrine)
१७) कान, नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (foreign body in ear, nose or throat emergency)
१८) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogenital Anamolies requiring urgent surgical intervention)
१९) ब्रेन ट्युमर (Brain Tumour)
२०) भाजणे (Burns)
२१) इपिलेप्सी (Epilepsy)
२२) ॲक्यूट ग्लॅकोमा (Acute Glaucoma)
२३) स्नायपणतः स्फोट (मज्जारज्जू) संबंधात आकस्मिक आजार
२४) उष्माघात
२५) रक्तासंबंधातील आजार
२६) प्राणी चावल्यामुळे होणारी विषबाधा
२७) रसायनामुळे होणारी विषबाधा

गंभीर आजार- भाग २

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे (Heart Surgery)
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया (Bye pass Surgery)
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation)
५) रक्ताचा कर्करोग (Blood Cancer)

*******

पोलीस दलातील अधिकारी /कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबातील व्यक्ती यांच्यासाठी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय, क्रमांक : पीडब्ल्यूएफ -१२०४/१४३/प्र.क्र.२/भाग-३/पोल-७.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २८ जुलै, २००६.

वाचा :-१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१२०४/१४३/प्र.क्र.२/पोल-७,
दिनांक २ डिसेंबर,२००५.
२) शासन पूरकपत्र, गृह विभाग, क्रमांक पीडब्ल्यूएफ-१२०४/१४३/प्र.क्र.२/पोल-७,
दिनांक ६ फेब्रुवारी, २००६.
३) शासन निर्णय, गृह विभाग,क्र.पीडब्ल्युएफ-१२०४/१४३/प्रक्र-२/भाग-३/पोल-७,
दिनांक २८ जुलै २००६.

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्याच्या पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील व्यक्ती यांच्याकरिता महाराष्ट्र राज्य पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांक - पीडब्ल्युएफ-१२०४/१४३/प्र.क्र-२/पोल-७, दिनांक २ डिसेंबर २००५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याशिवाय वरील अनुक्रमांक तीन येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये स्वीय प्रपंची खाते उघडण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. स्वीय प्रपंची खाते उघडण्यास मान्यता देतांना महालेखापाल, महाराष्ट्र राज्य व वित्त विभाग यांनी सुचविलेल्या सूचना विचारात घेऊन वरील अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयात सुधारणा करण्याची आवश्यकता होती. वरील अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयात करावयाच्या सुधारणा विचारात घेऊन सर्व समावेशक आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

2204-640

याचा सर्वांगीण विचार करुन शासन वरील संदर्भात नमूद केलेले आदेश व परिपत्रक अधिक्रमित करुन "महाराष्ट्र राज्य पोलीस कुटुंब आरोग्य योजना" पुढीलप्रमाणे राबविण्यास मान्यता देत आहे :-

१. या योजनेस "महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना " या नावाने संबोधण्यात यावे.

२. या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी राज्य पोलीस दलातील सर्व प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासह त्यांच्यावर अवलंबून असलेल्या,महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकीय देखभाल ) अधिनियम, १९६१ मधील नियम २ (३) मधील ' कुटुंब ' या संज्ञेअंतर्गत समाविष्ट असणा-या व्यक्ती पात्र राहतील.

३. या योजनेनुसार पात्र होणा-या व्यक्तीस, करारात अंतर्भूत असलेल्या खाजगी रुग्णालयात आंतररुग्णालयीन औषधोपचार घेण्यासाठी, त्रयस्थ पक्ष प्रशासक ओळखपत्रे देतील. मात्र संबंधित घटक प्रमुख देण्यात आलेली ओळखपत्रे पात्र व्यक्तींना दिली आहेत याची खात्री करुन घेतील.

४. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कर्मचा-यांना देण्यात येणा-या ओळखपत्राचा खर्च त्रयस्थ पक्ष प्रशासकास देण्यात येणा-या सेवाशुल्कातून भागविण्यात येईल.

५. या योजनेखाली देण्यात येणा-या ओळखपत्राचा संबंधित घटक प्रमुखांनी सतत आढावा घेऊन बदली किंवा सेवानिवृत्ती,मृत्यू,बडतर्फी इत्यादि कारणांमुळे सेवेतून मुक्त झालेले कर्मचारी यांची नांवे लाभार्थी यादीतून कमी करण्याची आणि बदलीने आलेले नवीन व नवनियुक्त कर्मचारी यांना या योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

स्पष्टीकरण:- या योजनेतंर्गत पोलीस दलातील कोणत्याही प्रवर्गातील अधिकारी/ कर्मचारी रजेवर असल्यास किंवा त्यास निलंबित केले असल्यास तो व त्यांचे कुटुंबिय लाभ घेण्यास पात्र राहतील.

६. या योजनेतंर्गत, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.एमएजी २००५/प्र.क्र.१/आरोग्य-३ ,दि.१९/३/२००५ अन्वये, शासनाने निश्चित केलेल्या २७

आकस्मिक व ५ गंभीर अशा एकूण ३२ आजारांवर रुग्णालयांत औषधोपचार विनामूल्य देण्यात येतील. वरील शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या ३२ आजाराव्यतिरिक्त जर काही आजार अंतर्भूत केले किंवा त्यातून काही आजार कमी केले तर या योजनेत त्याप्रमाणे बदल झाला आहे असे समजण्यात यावे.

७. या योजनेतंर्गत पोलीस बलातील अधिकारी / कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित व्यक्ती यांना जे विनामुल्य औषधोपचार दिले जाणार आहेत त्या अनुषंगाने होणा-या खर्चाची रक्कम केंद्र शासन आरोग्य योजनेतंर्गत (C.G.H.S.) विहित केलेल्या खर्चापेक्षा अधिक असणार नाही.

८. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई हे त्यांचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन त्रयस्थ पक्ष प्रशासक (Third Party Administrator) नेमतील आणि प्रशासकास दरमहा प्रत्येक कुटुंबामागे रु.५/- याप्रमाणे किंवा स्पर्धात्मक निविदानुसार येणारी किंमत विचारात घेऊन दोहोंपैकी जे कमी असेल इतके सेवाशुल्क देतील. या संदर्भात होणारा खर्च प्रधान शिर्ष "२०५५-पोलीस, ००१, संचालन व प्रशासन (००) (०१) पोलीस निरीक्षणालय- (२०५५ ००१४)- १२-व्यावसायिक व विशेष सेवा" आणि "२०५५- पोलीस १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०१), पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई (२०५५ ००७१) (०१)(०१) आस्थापना - १२, व्यावसायिक व विशेष सेवा" या खाली वेळोवेळी केल्या जाणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, रुग्णालय आणि त्रयस्थ पक्ष प्रशासक, वरील अ.क्र.२ नुसार पात्र व्यक्तींना वरील अ.क्र.६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आजारावर विनामूल्य औषधोपचार देणेबाबत निवडक खाजगी रुग्णालयाशी वेळोवेळी त्रिपक्षीय करार करतील. या करारात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्यासह संबंधित त्रयस्थ पक्ष प्रशासक आणि खाजगी रुग्णालय यांनी पार पाडावयाची जबाबदारी आणि कर्तव्ये यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी यापूर्वी त्रयस्थ पक्ष प्रशासक आणि रुग्णालय यांच्याशी तीन वर्षाकरिता केलेला करार वैध मानण्यात यावा. मात्र या करारात वरील अ.क्र.६ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे आजारांबाबत तरतुद करण्यात यावी.

१०. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची संख्या लक्षात घेऊन एक वेळची बाब म्हणून एकूण रुपये ७.५ कोटी शासकीय अनुदान शासन देईल. सदर रक्कम यथास्थिती अधिदान व लेखा अधिकारी/कोषागार अधिकारी यांच्या कार्यालयाकडून रितसर देयक सादर करुन काढून घेऊन ती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या नांवे या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी उघडण्यात येणा-या स्वीय प्रपंची लेखामध्ये जमा करण्यात येईल. त्यानंतर पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांजकडून मागील वर्षी सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केलेल्या २७ आकस्मिक व ५ गंभीर आजाराच्या बाबतीत मंजूर करण्यात आलेली प्रतिपूर्तीची रक्कम विचारात घेऊन, प्रधान शिर्ष "२०५५-पोलीस, ००१, संचालन व प्रशासन (००) (०१) पोलीस निरीक्षणालय- (२०५५ ००१४)- ०१ वेतन" आणि "२०५५- पोलीस १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०१), पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई (२०५५ ००७९) (०१)(०१) आस्थापना ०१ वेतन" या बाबी खाली प्रत्येक वर्षी तरतूद करण्यात येईल. वरीलप्रमाणे केलेल्या तरतुदीतून संपूर्ण वर्षाकरिता अधिदान व लेखा अधिकारी यांना महाराष्ट्र कोषागार नियमावलीतील नमुना क्र.२८ नुसार देयके सादर करुन संपूर्ण वर्षाचा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेली तरतूद काढण्यात येईल व सदरहू रक्कम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या नावे भारतीय रिझर्व्ह बँकेत उघडण्यात येणा-या स्वीय प्रपंची खात्यात त्यांच्या आवश्यकतेनुसार जमा करण्यात येईल.

११. पोलीस दलातील अधिकारी/ कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय यांना या योजनेतंर्गत विनामुल्य औषधोपचार उपलब्ध करुन देणे अपेक्षित असल्यामुळे, त्रयस्थ पक्षीय करारात अंतर्भूत असलेल्या, खाजगी रुग्णालयाने पोलीस अधिकारी /कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय

यांच्याकडून कोणतीही रक्कम वसूल करु नये. पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी या त्यांच्या कुटूंबातील सदस्याने रुग्णालयात जाऊन आंतररुग्णालयीन औषधोपचार घेतल्यानंतर झालेल्या खर्चाची नियमानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती सुलभतेने होण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व विहित नमून्यावर शासकीय कर्मचा-यांची स्वाक्षरी रुग्णालय सोडण्यापूर्वी रुग्णालयातच घेण्यात येईल.

१२. या योजनेतंर्गत सभासदाने विनाखर्च औषधोपचार घेतल्यानंतर, वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आवश्यक असलेले सर्व विहित नमुने भरुन व त्यावर शासकीय कर्मचारी व वैद्यकीय अधिका-यांची स्वाक्षरी झालेल्या औषधोपचाराच्या खर्चाच्या देयकासह सर्व विहित नमुने संबंधित त्रयस्थ पक्ष प्रशासकाकडे पाठवेल. रुग्णालयाने पाठविलेली कागदपत्रे व औषधोपचारांचे देयकाची तपासणी करुन लावण्यात आलेले शुल्क (Charges) योग्य असल्याची खात्री करुन, देयक व तत्सम कागदपत्रे त्रयस्थ पक्ष प्रशासक पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य / पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना सादर करतील. त्रयस्थ पक्ष प्रशासकाने सादर केलेली, कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य / पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई औषधोपचाराच्या देयकाची रक्कम संबंधित रुग्णालयास धनादेशाव्दारे अदा करतील.

१३. सदर योजनेतंर्गत पोलीस दलातील व त्यांच्या कुटूंबियाने विनामूल्य औषधोपचार घेतल्यानंतर झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सुलभतेने लवकर होण्यासाठी प्रतिपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांवर वैद्यकीय अधीक्षक /जिल्हा शल्य चिकित्सक/ पोलीस रुग्णालयाचे पोलीस सर्जन प्रतिस्वाक्षरी करण्यास सक्षम राहतील.

१४. महाराष्ट्र वैद्यकीय देखभाल अधिनियमाखाली निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सध्या विभाग प्रमुखांना रु.४०,०००/- इतक्या रक्कमेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे अधिकार आहेत. तथापि, पोलीस अधिकारी /कर्मचा-यांना याबाबतीत खर्चाची कोणतीही मर्यादा न घालता वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना राहतील.

१५. "प्रशासकाकडून प्राप्त झालेली खाजगी रुग्णालयाची देयके पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडून वरील परिच्छेदात नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याकडे प्रतिस्वाक्षरीसाठी पाठविण्यात येतील. ही देयके प्रतिस्वाक्षरीत करुन मिळाल्यानंतर सदरहू देयके मंजूर करण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई हे करतील. मंजूर करण्यात आलेल्या देयकांचे योग्य लेखांकन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांच्या सहाय्याने, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई करतील." पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी पारित केलेली देयके नियमित लेखा परिक्षणाच्यावेळी लेखा परिक्षीत होतील.

१६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे नांवे उघडण्यात आलेले स्वीय प्रपंची खाते वर्षाच्या शेवटी 'निरंक' शिलकेवर बंद करण्याची व खात्यातून खर्च झालेल्या रक्कमेची प्रधान शिर्ष "२०५५-पोलीस, ००१, संचालन व प्रशासन (००) (०१) पोलीस निरीक्षणालय- (२०५५ ००१४)- ०१ वेतन" आणि "२०५५- पोलीस १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०१), पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई (२०५५ ००७९) (०१)(०१) आस्थापना ०१ वेतन" बाबीसमोर नोंद घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई करतील व शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ मध्ये अंतर्भूत असलेल्या आजारावरील प्रतिपूर्ती मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम परिच्छेद क्र. ९ मधील विहित पध्दतीचा अवलंब करुन कोषागारातून काढतील.

१७. या योजनेची अंमलबजावणी करतांना दुरुपयोग झाल्याचे निदर्शनास आल्यास, करारात अंतर्भूत असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत करारातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या सेवाशर्तीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१८. ही योजना दिनांक २-१२-२००५ पासून लागु राहील. या योजनपूर्वी घेतलेल्या औषधोपचाराची प्रतिपूर्ती शासनाच्या सध्याच्या अस्तित्वात असलेल्या सर्वसाधारण आदेशाप्रमाणे /नियमाप्रमाणे करण्यात येईल.

१९. या संदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक बी-१ "२०५५-पोलीस, ००१, संचालन व प्रशासन (००) (०१) पोलीस निरीक्षणालय- (२०५५ ००१४)- ०१ वेतन" व "१२, व्यावसायिक व विशेष सेवा" आणि "२०५५- पोलीस १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०१), पोलीस आयुक्तांचे कार्यालय, बृहन्मुंबई (२०५५ ००६९) (०१) (०१) आस्थापना ०१ वेतन" व "१२, व्यावसायिक व विशेष सेवा" या लेखाशिर्षाखाली करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

२०. हा शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२७ / ०६/ व्यय-७, दि.२४-१-२००६, अनौपचारिक संदर्भ क्र. ५२१/अर्थोपाय, दिनांक १-२-२००६, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९९/०६/आरोग्य-३, दिनांक २८-३-२००६ व महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (ले. व ह.) यांनी अनौपचारिक संदर्भ क्र. टी.एन./सीएच/II/पीएलए/युओआर/५२३, दिनांक ३०-६-२००६ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. २१४/कोषागार-५, दिनांक २-७-२००६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. न. नाईकनवरे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

तात्काळ

क्रमांक पोमसं/२८/४९३७/मपोकुआयो/४३/२०११ मुंबई दि. २८/०९/२०११

**संदर्भ :-** या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. २६/०४/२०११ चे परिपत्रक

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस दलाकरिता कुटुंब आरोग्य योजना राबविणेबाबत.

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबातील व्यक्ती यांच्यासाठी कुटुंब आरोग्य योजना राबविण्याबाबत शासनाने दि.०२/१२/२००५ च्या आदेशानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजना राबविणेबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वे सर्व पोलीस घटक प्रमुखांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सबंधित पोलीस घटक प्रमुखानी त्यांचे आस्थापनेवर सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन / पोलीस उप अधिक्षक मुख्यालय/ सहा. समादेशक यांच्या नियत्रणाखाली महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजनेच्या कामकाजाकरिता २ ते ३ कर्मचारी असलेला एक स्वतंत्र कंक्ष स्थापन करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु अद्याप सर्व पोलीस घटक प्रमुखांनी सदर कक्ष स्थापन केल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला नाही. त्यामुळे पोलीस घटक प्रमुखांची महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजना राबविणेबाबतची उदासीनता दिसून येत आहे.

महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर प्रथम टप्पात सद्या एकूण ८५ रुग्णालयाची निवड करण्यात आलेली आहे. [सोबत यादी जोडली आहे] सदर रुग्णालयांशी त्रिपक्षीय करार करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे उपरोक्त रुग्णालयाशी करार केल्यानंतर सबंधित जिल्हयाचे पोलीस घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र कुटुंब आरोग्य योजनेचा कक्ष तात्काळ कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. सदर कक्षामध्ये सोबत जोडलेल्या विवरण पत्र-अ, प्रमाणे कक्षामार्फत दररोज रुग्णालयाना भेट देवून रुग्ण दाखल झाल्याबाबतची खात्री करावी [Admission], आजार , रुग्णालयात राहिल्याचा [Stay], कालावधी, रुग्णाला रुग्णालयातून सोडल्याचा [Discharge], दिनांक इत्यादी बाबतच्या माहितीची नोंद नोंदवहीत नोंदणी करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल दरमहा १० तारखेपर्यत या कार्यालयास पाठवावा.

तसेच उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकान्वये महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयाची देयके पारित करण्याच्या कार्यपध्दती बाबत परिच्छेद १३ मध्ये विस्तृतपणे सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे सबंधित पोलीस घटक देयके प्राप्त झाल्यानंतर सदर देयकांची नोंद सोबत जोडलेल्या विवरणपत्र -ब प्रमाणे नोंद करुन आवश्यक ती कार्यवाही पुर्ण केल्यानंतर सदर तपासलेली देयके ही व्यवस्थापक [त्रयस्थ पक्ष प्रशासक ] महाराष्ट्र पोलीस कुटुंब

आरोग्य योजना, ४-बी, अधिकारी निवासस्थान पोलीस आयुक्त यांचे कार्यालयाचे कम्पाउंड पोलीस आयुक्त, मुंबई या पत्तावर पाठवावे.

तरी खालील नमुद सर्व पोलीस घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे आस्थापनेवर **महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा कक्ष स्थापन करणेबाबत वरील प्रमाणे तात्काळ** कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१५/१०/२०११ पर्यंत या कार्यालयास सत्वर पाठवावा.

21/9/11
( हेमंत नगराळे )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशा)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
अप्पर पोलीस महासंचालक , गु.अ.वि.,म.रा. पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतुक / लोहमार्ग म.राज्य,मुंबई / ए.एन.ओ.,म.राज्य,नागपूर
आयुक्त, रा.गु.वि, म.रा., मुंबई
संचालक, म.पो.अ.नाशिक
संचालक, पो.बि.सं., म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर / मो.प पुणे/ नाहसं पुणे/फोर्स वन मुंबई / वि.सु.वि.ट्रेनिंग पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उप महानिरीक्षक. अे. एन.ओ., नागपूर / गडचिरोली
सर्व पोलीस अधीक्षक
सर्व पोलीस प्राचार्य,
सर्व समादेशक,

प्रत सस्नेह सादर :-

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य,मुंबई.
व्यवस्थापकिय संचालक, म.रा., पोलीस गृह .नि.म.रा, मुंबई.

प्रत,

स्वीय सहाय्यक, पो.म.सं., म.रा., मुंबई
स्वीय सहाय्यक, अपर पोमसं [का. व सु.] आस्था/ का.व सु./ प्रशिक्षण / प्रशासन
स्वीय सहाय्यक, पो.उ.म.नि. [तरतुद]/ रा.रा.पो.बल मुंबई
पो.अ., रा. पो.नि. कक्ष, म.रा. मुंबई .

D:\MAKHWAN\Circular.doc

## महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना
### घटक कार्यालयात पॅनलवरील रुग्णालयात दाखल केल्यानंतर भेट दिल्याबाबत ठेवावयाची नोंदवही

**प्रपत्र-अ**

| अ.क्र. | पेशंटचे नांव | कर्मचा-याचे नांव/हुद्दा | नाते संबध | पोलीस घटकाचे नांव | हॉस्पीटलचे नांव | आजार | हॉस्पीटलमध्ये दाखल झाल्याचा दिनांक | भेट देणा-या अधिका-याचे नांव व हुद्दा | म.पो.कु.आ.यो. कक्षा मार्फत पडताळणी केल्याबाबतची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

E:\User\Documents\Chart.doc

# महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना
## घटक कार्यालयात पॅनलवरील रुग्णालयाची देयके प्राप्त झाल्याबाबत ठेवावयाची नोंदवही

**प्रपत्र-ब**

| अ.क्र. | पेशंटचे नांव | कर्मचा-याचे नांव / हुद्दा | पोलसी घटकाचे नांव | नाते संबध | हॉस्पीटलचे नांव | आजार | हॉस्पीलट मध्ये दाखल दिनांक | डिसर्चाज दिनांक | देयक प्राप्त झाल्याचा दिनांक | बिलाची रक्कम | जिल्हा शल्य योग्यता प्रमाणपत्र | देयक त्रयस्थ पक्ष प्रशासकाकडे पाठविल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |

क्र.पोमसं/२८/मपोकुआयो/ ओळखपत्र/४३/२०११ मुंबई, दिनांक-४/११/२०११

विषयः महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या ओळखपत्राबाबत.

*******

परिपत्रकः-

सध्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलात [बृहन्मुंबई वगळून] एकूण १,८५,१२९ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत एकूण १,२३,९२७ इतक्या अधिकारी/ कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणा-या कुटुंबियांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजने अंतर्गत ओळखपत्रे पुरविण्यात आली आहेत. तसेच उर्वरीत एकुण ६१,२०२ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना अदयापही ओळखपत्रे पुरविणे शिल्लक आहेत.

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या नवीन सुधारित कार्यपध्दतीनुसार १ फेब्रुवारी २०१२ पासुन पोलीस अधिकारी/ कर्मचा-याकडे कुटुंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र नसल्यास त्यांना योजनेअंतर्गत उपचार घेता येणार नाहीत. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्वपरिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालयात योजनेचे त्रयस्थ पक्ष प्रशासक मे.एफ.एच.पी.एल. कंपनीचे प्रतिनिधी नेमण्यात आलेले आहेत. तरी सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/ कर्मचा-यांपैकी किती लोकांना अदयाप ओळखपत्रे प्राप्त झालेली नाहीत अशा कर्मचा-यांचे ओळखपत्रासाठीचे अचुक भरलेले फॉर्म्स त्यांची पडताळणी करुन प्रमाणपत्रासह दि.१५.१२.२०११ पूर्वी सत्वर त्यांचे परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कार्यालयात नेमण्यात आलेल्या मे.एफ.एच.पी.एल. कंपनीच्या प्रतिनिधीकडे पाठवावेत व त्यांचेकडुन ओळखपत्रे प्राप्त करुन घ्यावीत .

दिनांक १ फेब्रुवारी २०१२ नंतर ओळखपत्र नसलेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत उपचार घेता येणार नसल्याचे सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी याचेकडे कुटुंब आरोग्य योजनेचे ओळखपत्र नाहीत अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ओळखपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी व तसा अनुपालन अहवाल पोलीस महासंचालक

कार्यालयास पाठविण्यात यावा. ओळखपत्र नसल्याने एखादया कर्मचा-यास उपचार न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी घटक प्रमुखांची राहील याची कृपया नोद घ्यावी.

Lnagrale 4/11
[ हेमंत नगराळे ]
विशेष पोलीस महानिरीक्षक [प्रशा],
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
अप्पर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.,म.रा., पुणे,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके/ रा.रा.पो.बल/ वाहतुक/
लोहमार्ग,म.राज्य,मुंबई/ए.एन.ओ.,म.राज्य, नागपूर,
आयुक्त, रा.गु.वि.,म.रा.,मुंबई,
संचालक, म.पो.अ.नाशिक,
संचालक, पो.बि.सं.म.रा.पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे/नागपूर/मो.प.पुणे/नाहसं पुणे/फोर्स वन मुंबई/
वि.सु.वि.ट्रेनिंग पुणे,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,
पोलीस उप महानिरीक्षक, अे.एन.ओ.,नागपूर/गडचिरोली,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व पोलीस प्राचार्य,
सर्व समादेशक,

प्रत सस्नेह सादर-

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य, मुंबई,
व्यवस्थापकिय संचालक, म.रा., पोलीस गृह, नि.म.रा., मुंबई,

Employee Form Submission Date: ........ Unit Office Submission Date: ........
DG Office Submission Date: ........

महाराष्ट्र पोलिस कुटुंब आरोग्य योजना
सदस्यत्व नोंदणी नमुना

नाव : [ ] [ ] [ ]
स्वतःचे नाव — वडिलांचे नाव / पतीचे नाव — आडनाव

भ.नि.नि.क्र : [ ]

जन्म दिनांक: [ ] सेवानिवृत्त दिनांक: [ ]

नियुक्तीचे ठिकाण ........................ पदनाम ........................ बक्कल क्रमांक ..................

**अधिकारी / कर्मचारी यांचेवर अवलंबून असलेल्यांची माहिती**

| अ.क्र. | नाव | नाते | जन्म तारीख / वय |
|---|---|---|---|
| | | पत्नी / पती | |
| | | १ले अपत्य | |
| | | २रे अपत्य | |
| | | ३रे अपत्य (दि. ०१ मे २००१ रोजी किंवा तत्पुर्वीचे ) | |
| | | आई / सासू | |
| | | वडिल / सासरे | |

खालील भागात छायाचित्र चिकटवावीत

| अधिकारी / कर्मचारी | पत्नी / पती | १ले अपत्य | २रे अपत्य | ३रे अपत्य (दि. ०१ मे २००१ रोजी किंवा तत्पुर्वीचे ) | आई / सासू | वडिल / सासरे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| स्वाक्षरी | | | | | | |

अधिकारी / कर्मचारी स्वाक्षरी

टिप : १) सभासदास दोन पेक्षा जास्त अपत्य असतील तर कुटुंब नियोजन केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२) सभासदाने जुळ्या अपत्यांची माहिती देणे आवश्यक आहे.
३) अर्जावर रंगीत छायाचित्र लावावे. तसेच अर्जासोबत अतिरिक्त छायाचित्रांचा एक संच जोडावा.
४) अर्जामधील माहिती काळया शाईने भरावी व नावे इंग्रजीमध्ये लिहावीत.
५) अर्जदाराने इतर कुटुंबियाचे ओळखपत्रासाठी अर्ज करतेवेळी स्वतःचे मपोकुआयोचे ओळखपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

# कर्मचारी / अधिकारी सदस्यांचे संमतीपत्र

मी असे जाहीर करतो की, वैद्यकिय प्रतिपूर्तीबाबत नियमानुसार माझी व आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे माझ्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबियांची मागे नमुद केलेली माहिती पूर्णपणे खरी व बरोबर आहे. (अवलंबून असलेले आई वडील (महिला कर्मचाऱ्यांच्याबाबतची सासू सासरे) यांना निवृत्ती वेतन मिळत असेल / नसेल तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा निवृत्ती वेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तरी अशा सर्व प्रकरणी उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रू. १५००/-- इतके मूळ निवृत्ती वेतन घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजेच रू. १५००/--अधिक त्यावरील उपचार सुरू करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाईवाढ) इतकेच आहे.

मी वर नमूद दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास, केलेल्या औषधोपचाराची संपूर्ण रक्कम एकरकमी भरण्यास मी तयार आहे. तसेच खोटी माहिती पुरविल्याबद्दल माझ्याबद्दल योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव असून त्याबद्दल मी स्वतः पूर्ण जबाबदार राहीन. तसेच रूग्णालय सोडताना मी वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांवर स्वाक्षरी करीन, मी स्वाक्षरी न केल्याने वैद्यकीय देयके वेळेत मंजूर न झाल्यास, घेतलेल्या औषधोपचाराची संपूर्ण रक्कम एकरकमी माझ्या पगारातून कापून घेण्यात येईल याची मला समज मिळाली आहे.

**नियम व अटी**

१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचे खालील नियम मला मान्य आहेत.

२) महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्याप्रमाणे माझ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती देय राहील. (यामध्ये पती/पत्नी, पहिली दोन मुले, दि. १ मे २००१ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे ३ रे अपत्य, अवलंबून असणारे आई वडील, महिला कर्मचाऱ्यांबाबतीत आई/वडील किंवा सासू/सासरे). राज्य/केंद्र सरकारी व निमसरकारी सेवेतून सेवानिवृत्त झालेले असल्यास व त्यांना निवृत्ती वेतन मिळत असेल/नसेल तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा निवृत्ती वेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तरी अशा सर्व प्रकरणी उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रु. १५००/-- इतके मूळ निवृत्तीवेतन घेणाऱ्या सेवानिवृत्त राज्य शासकिय कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रु. १५००/— अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाईवाढ) इतकेच आहे. यापेक्षा जास्त असल्यास त्यांना या योजनेचा लाभ देता येणार नाही. याची सभासदाने नोंद घ्यावी.

३) शासनाकडून होणाऱ्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम योजनेच्या बँक खात्यामध्ये जमा होईल

४) मला माझ्या पदानुसार पात्र असणाऱ्या वर्गामध्ये प्रवेश घेवून तिथे औषधोपचार घेईन. मला मात्र नसणाऱ्या वर्गामध्ये प्रवेश घेतल्यास जी फरकाची रक्कम येईल ती मी भरण्यास बांधील आहे. (अशा रक्कमेची प्रतिपुर्ती देय नाही)

५) सदर योजनेचा लाभ १९ मार्च २००५ नुसार जाहीर केलेल्या २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांसाठी आहे याची मला माहीती आहे.

६) जर मी दिलेली माहीती असत्य असल्यास माझे सभासदत्व रद्द करुन मला वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देय राहणार नाही याची मला जाणीव आहे.

समक्ष

अधिकारी /कर्मचारी यांची स्वाक्षरी

संबधित प्राधिकृत प्रभारी अधिकारी